आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।



# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) छत्रपती संभाजीनगर

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्रमांक. ५३

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षर करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

# Role of School Leadership in Financial Literacy of Rural Students

**प्रस्तावना -**

सार्‍या जगाला 2019 मध्ये हादरवून सोडणाऱ्या करोनाने माणसाला सामान्य जगतातून डिजिटल जगाकडे कसे वळवले हे कळलेच नाही. डिजिटल काळ हा मानवी इतिहासातील एक क्रांतीकारी टप्पा आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अधिकाधिक डिजिटल होत आहे आणि याचा आपल्या जीवनावर मोठा प्रभाव पडत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेवरही मोठा प्रभाव टाकला आहे. ई-कॉमर्स, ऑनलाईन बँकिंग आणि डिजिटल मार्केटिंग यासारख्या तंत्रज्ञानामुळे व्यवसायांना अधिक कार्यक्षम आणि फायदेशीर बनण्यास मदत झाली आहे.

करोना कार्यकाळात आर्थिक व्यवहार जवळजवळ थांबलेच होते. पेटीएम, ऑनालाईन बँकिंग यावर अधिक भर दिला गेला आणि आजही कॅशलेस व्यवहार अधिक सोयीचा आणि सहज उपलब्ध पर्याय निर्माण झाला आहे. शहरात जवळजवळ कॅशलेस व्यवहारच चालतो. त्याचे ज्ञान शहरी भागातील लोकांना आहे परंतु ग्रामीण भागात जर गेलात तर आजही कॅशलेस व्यवहार करताना ग्रामीण जनता घाबरते. ऑनलाईन पेमेंट करताना त्यांचा संभ्रम होतो, गोंधळ होतो. बरेचदा फसवणूक देखील होते. साधे साधे आर्थिक व्यवहार करताना पालक, विद्यार्थी घाबरतात. बँकेत गेले असता साधी विड्रॉल स्लिप देखील ग्रामीण लोक इतरांच्या मदतीने भरुन घेतात. या सगळया गोष्टींचा विचार करता असे वाटते की, शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील जनता देखील आर्थिक साक्षर होणे गरजेचे आहे. जनता आर्थिक साक्षर होण्यासाठी भावीपिढी म्हणजेच शालेय विद्यार्थी आर्थिक साक्षर झाले पाहिजे.

केंद्रप्रमुख म्हणून शाळा भेटी करीत असताना विद्यार्थ्यांशी बँकेच्या व्यवहाराबाबत, ऑनलाईन शॉपींग बाबत चर्चा करताना असे आढळले की, ही मुले यापासून खुपच अनभिज्ञ आहे. मुलांना या बाबतीत साक्षर करावे यासाठी शालेय नेतृत्व व शिक्षकांनी काम करावे असे वाटू लागले. त्याचवेळी जिल्हा परिषद नागपूर तर्फे आर्थिक साक्षरतेविषयी शिक्षकांची दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी काही निवडक शिक्षकांना आर्थिक साक्षरतेचे महत्व काय व त्यासाठी शाळेने काय उपक्रम राबवावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता 5 वी ते 8 वी च्या जिल्हा परिषद शाळांमध्ये आर्थिक साक्षरतेच्या तासिका घेण्याचे नियोजन देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थी हा आर्थिक साक्षर होण्यासाठी शालेय नेतृत्व व शिक्षक मेहनत घेत आहेत. या मुलांच्या आर्थिक साक्षर होण्यासाठी काम करणाऱ्या शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास या मोड्युल अंतर्गत करण्यात आलेला आहे.

**मोड्युल अध्ययनाची उद्दिष्टे -**

1) आर्थिक साक्षरतेचे महत्त्व समजून घेणे.

2) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेची उपयोगिता समजावून सांगणे.

3) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षर करण्यासाठी शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे.

4) आर्थिक साक्षरते बाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

महाराष्ट्राच्या शालेय अभ्यासक्रमात आर्थिक साक्षरता हा विषय 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून समाविष्ट करण्यात आला. राज्य शिक्षण मंडळाने पाचवी ते दहावीच्या वर्गासाठी आर्थिक साक्षरता हा स्वतंत्र विषय तयार करुन अभ्यासक्रमात समावेश केला आहे.

**शासनाव्दारा हे पाऊल का उचलण्यात आले?**

- विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक व्यवहाराबाबत जागकरुकता निर्माण करणे.
- पैशाचे योग्य नियोजन आणि गुंतवणूकीचे मूलभूत ज्ञान देणे.
- विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे.

**आर्थिक साक्षरता अभ्यासक्रमात काय समाविष्ट आहे?**

- बजेट तयार करणे आणि त्याचे व्यवस्थापन
- बचत आणि गुंतवणूकीचे प्रकार
- बँकिंग व्यवहार
- उद्योजकता

**शाळांमध्ये हा विषय कसा शिकविला जातो?**

- शास्त्रीय पध्दत
- गटचर्चा आणि वादविवाद
- प्रकल्प आणि कार्ये
- खेळ आणि क्रियाकलाप
- विनोबा ऍ़प वरील शिक्षक सक्षमीकरण द्वारे

**आर्थिक साक्षरता शिकण्याचे फायदे -**

- विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक जबाबदारीची भावना निर्माण होते
- विद्यार्थी चांगले आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनतात.
- भविष्यातील आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी तयार होतात.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील आर्थिक साक्षरता -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये आर्थिक साक्षरतेला अत्यंत महत्व दिले आहे. धोरणाचा उद्देश विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक बनविणे हा आहे. धोरणात आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक उपाययोजनांचा समावेश आहे.

**प्रमुख उपाययोजना -**

- **पाठ्यक्रमात आर्थिक शिक्षणाचा समावेश** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार पाठ्यक्रमात आर्थिक शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. यात बचत, गुंतवणूक, कर्ज, कर, विमा आणि आर्थिक नियोजन यासारख्या विषयांचा समावेश असेल.
- **शिक्षकांसाठी प्रशिक्षण** : आर्थिक शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची तरतुद धोरणात करण्यात आली आहे.
- **आर्थिक साक्षरता कार्यक्रम** : विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातील.
- **तंत्रज्ञानाचा वापर** : आर्थिक शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जाईल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे उद्दिष्टे -**

- विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक संकल्पना आणि कौशल्ये विकसित करणे.
- विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या जबाबदार निर्णय घेण्यास सक्षम बनविणे.
- विद्यार्थ्यांना आर्थिक फसवणूकीपासून बचाव करणे.
- विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहित करणे.

**धोरणाची अंमलबजावणी -**

या धोरणाची अंमलबजावणी केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि शिक्षण संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांद्वारे केली जाईल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील आर्थिक साक्षरतेची काही महत्वाची वैशिष्ट्ये -**

- धोरणात आर्थिक साक्षरतेला आवश्यक कौशल्य मानले आहे.
- धोरणात आर्थिक शिक्षणाला पाठ्यक्रमाचा अविभाज्य भाग बनविण्यावर भर दिला आहे.
- धोरणात आर्थिक शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला आहे.
- धोरणात आर्थिक साक्षरता कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विविध संस्थांशी सहभागिता करण्यावर भर दिला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील आर्थिक साक्षरतेची तरतुद विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि जबाबदार नागरिक बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

आजच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक साक्षरता समजून घेणे महत्वाचे आहे. तरीही भारताच्या लोकसंख्येच्या एका महत्वपूर्ण भागाकडे या आवश्यक ज्ञानाचा अभाव आहे. केवळ 27 टक्के भारतीय आणि केवळ 16.7 टक्के विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या साक्षर मानले जात असताना शालेय अभ्यासक्रमांमध्ये आर्थिक शिक्षण अंतर्भूत करण्यात आले. आर्थिक समजुतीतील या अंतरामुळे वैयक्तिक वित्त व्यवस्थापीत करणे, माहितीपूर्ण निर्णय घेणे आणि आर्थिकदृष्ट्या स्थिर भविष्य सुरक्षित करण्यात आव्हाने निर्माण होऊ शकतात.

शाळांमध्ये मनी मॅनेजमेंट शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक जबाबदाऱ्या आत्मविश्वासाने पेलता येतील.

**शाळांमध्ये आर्थिक साक्षरतेची आवश्यकता -**

ज्याप्रमाणे ठोस शिक्षण घेणे महत्वाचे आहे त्याचप्रमाणे पैशाच्या व्यवस्थापनाची मूलभूत माहिती असणे आवश्यक आहे. शाळांमध्ये आर्थिक साक्षरता शिकवणे म्हणजे केवळ हुशार ग्राहक तयार करणे नव्हे तर आयुष्यभर जबाबदार आर्थिक वर्तनाचा पाया तयार करणे. शालेय अभ्यासक्रमांमध्ये आर्थिक साक्षरता समाविष्ट करण्याचे फायदे पुढीलप्रमाणे.

**1) जबाबदारीची भावना निर्माण करणे :** सुरुवातीचे शिक्षण आर्थिक व्यवस्थापनासाठी जबाबदारीची भावना विकसित करण्यास हातभार लावते. हे शालेय मुलांना मिळणाऱ्या पैशाचे व्यवस्थापन आणि पैशाचे मूल्य किती महत्वाचे आहे हे शिकविते. हे मूलभूत ज्ञान त्यांना वाजवी खर्च करण्याच्या सवयी विकसित करण्यास प्रोत्साहित करते आणि भविष्यात मोठ्या आर्थिक जबाबदाऱ्या हाताळण्यासाठी त्यांना तयार करते.

**2) निर्णय घेण्याचे सक्षमीकरण :** लहान वयातच मनी मॅनेजमेंट समजून घेतल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या आर्थिक बाबतीत माहितीपूर्ण निर्णय घेण्याचे कौशल्य मिळते. यामध्ये त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांशी जुळणारे करिअर मार्ग निवडण्यापासून ते वैयक्तिक वित्त आणि कर्जे जबाबदारीने व्यवस्थापित करण्यापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे. आर्थिक मूलभूत आकलन त्यांचा आत्मविश्वास वाढवते. ज्यामुळे ते त्यांच्या आर्थिक निर्णयांसाठी बाह्य सल्ल्यावर कमी अवलंबून असतात.

**3) प्रौढ जीवनाची तयारी :** प्रौढत्वाच्या संक्रमणाशी संबंधित काही आर्थिक अडथळे आहेत. प्रारंभिक आर्थिक शिक्षण हमी देते की, मुले या अडचणींना तोंड देण्यासाठी अधिक सुसज्ज आहेत. ते बजेट, बचत आणि हुशारीने गुंतवणूक करायला शिकतात. वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही स्तरावर त्यांच्या

विकासासाठी आवश्यक कौशल्ये शिवाय ते त्यांना आर्थिक स्वातंत्र्याच्या मार्गावर स्थिर करते. तणाव कमी करते आणि जीवनातील आर्थिक चढउतारांवर मार्गदर्शन करण्याची क्षमता वाढविते.

**4) उद्योजकतेची भावना वाढविणे :** उद्योजकतेकडे कल असलेल्या व्यक्तींसाठी, व्यवसाय व्यवस्थापित करण्याबाबत आर्थिक पैलू समजून घेणे अत्यावश्यक आहे. शाळा आधारीत आर्थिक साक्षरता विद्यार्थ्यांना अर्थसंकल्प, आर्थिक अंदाज आणि व्यवसाय नियोजन या आवश्यक गोष्टींची ओळख करुन देते. हे सर्जनशील विचार आणि समस्या सोडविण्याच्या क्षमतांना प्रोत्साहन देते आणि त्यांची स्वत:ची कंपनी सुरु करण्याच्या आणि चालविण्याच्या अडचणींसाठी त्यांना तयार करते.

**5) जबाबदार आर्थिक नागरिक तयार करणे :** विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता जबाबदार आर्थिक नागरिकांच्या विकासात योगदान देते हे विद्यार्थ्यांना आर्थिक चर्चेत अर्थपूर्णपणे सहभागी होण्यास, ग्राहक हक्क समजून घेण्यास आणि समुदायाला लाभदायक निवडी करण्यास सक्षम करते. जाणकार विद्यार्थी त्यांच्या आर्थिक निर्णयांचा व्यापक परिणाम समजून समाजाच्या आर्थिक कल्याणासाठी सकारात्मक योगदान देण्याची अधिक शक्यता असते.

**आर्थिक साक्षरतेबद्दल विद्यार्थी काय शिकू शकतात -**

शालेय अभ्यासक्रमात आर्थिक साक्षरतेचा समावेश करुन विद्यार्थी खालील बाबी शिकू शकतील.

**1) पैशाचे मूल्य समजून घेणे :** विद्यार्थ्यांना गरजा आणि गरज यांच्यात फरक करण्यास शिकवा. योग्य, आवश्यक ठिकाणी खर्च करण्याबाबत निर्णयांना प्रोत्साहन द्या.

2) **अर्थसंकल्प तयार करणे आणि वित्त व्यवस्थापित करणे :** भविष्यातील उद्दिष्टांसाठी दैनंदिन खर्चापासून दीर्घकालीन बचतीपर्यंत सुज्ञ आर्थिक नियोजनासाठी मूलभूत बजेट तयार करा.

**3) बचत धोरणे :** बचतीचे महत्व अधोरेखित करा, वेळोवेळी व्याजासह लहान बचत कशी वाढू शकते हे दाखवून द्या.

**4) कमाई आणि उत्पन्न :** विद्यार्थी पैसे कमविण्याचे वेगवेगळे मार्ग शोधतील तसेच हे समजून घेतील की कठोर परिश्रम आणि नाविण्यपूर्णतेमुळे आर्थिक बक्षिसे मिळू शकतात. हे उत्पन्न मिळवताना कामाची नैतिकता आणि सर्जनशिलता खूप महत्वाची आहे याबाबत विद्यार्थ्यांना सांगणे, पटवून देणे आवश्यक आहे.

**5) बँकींग आणि वित्तीय सेवा :** मूलभूत बँकींग सेवांची समज, बँका कशा चालवतात आणि वैयक्तिक वित्तसंबंधात त्यांची भूमिका ही आणखी एक महत्वाची बाब आहे. मनी मॅनेजमेंटमध्ये बँकींगची प्रासंगिकता तसेच विविध प्रकारची बँक खाती आणि त्यांचा वापर कसा करायचा हे विद्यार्थ्यांना शिकवले जाईल.

**6) आर्थिक उत्पादने आणि दर समजून घेणे :** विद्यार्थ्यांना विविध आर्थिक उत्पादनांबद्दल आणि कर्ज, बचत आणि गुंतवणूकीसाठी प्रमाणित दर म्हणजे काय याची माहिती मिळेल. हे समजल्यामुळे ते भविष्यात आत्मविश्वासाने आर्थिक स्रोत निवडू शकतील.

**7) आर्थिक धोरणे आणि कर :** करांसह आर्थिक धोरणांची सामान्य माहिती असणे आवश्यक आहे. उदा. विद्यार्थी देशाच्या नवीन कर प्रणालीबद्दल जाणून घेऊ शकतात. हे त्यांना सरकारी धोरणे वैयक्तिक वित्त आणि कर कायद्यांचे पालन करण्याचे महत्व कसे प्रभावित करतात हे समजून घेण्यास मदत करते.

**8) दैनंदिन खर्च :** दैनंदिन खर्चाचे व्यवस्थापन हे एक व्यावहारिक कौशल्य आहे जे विद्यार्थी आयुष्यभर वापरतील. दैनंदिन खर्चाचा मागोवा घेणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक अडचणी टाळण्यास मदत करते .

**ग्रामीण भागातील आर्थिक साक्षरता : विचार आणि उपाय -**

ग्रामीण भागातील जनतेशी आर्थिक साक्षरता ही भारताच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात आर्थिक साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात जसे की,

**कर्ज डोंगर :** ग्रामीण लोक अनेकदा अनैतिक कर्जदारांकडून कर्ज घेतात, ज्यामुळे ते कर्जात अडकतात.

**फसवणूक :** आर्थिक ज्ञानाचा अभाव असल्यामुळे ग्रामीण लोक अनेकदा फसवणूकीला बळी पडतात.

**गरिबी :** आर्थिक साक्षरतेचा अभाव गरिबीला कारणीभूत ठरु शकतो.

**अयोग्य गुंतवणूक :** ग्रामीण लोक अनेकदा योग्य गुंतवणूकीच्या पर्यायांबद्दल अनभिज्ञ असतात.

या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी खालील उपाययोजना राबविता येईल.

- **सरकारी योजना :** सरकारने ग्रामीण भागातील लोकांसाठी आर्थिक साक्षरता कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. या कार्यक्रमांमध्ये बचत, गुंतवणूक, कर्ज व्यवस्थापन आणि विमा यासारख्या विषयांचा समावेश असावा.

- **बँका आणि वित्तीय संस्था :** बँक आणि वित्तीय संस्थांनी ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.
- **शाळा आणि शिक्षण संस्था :** शाळा आणि शिक्षण संस्थांमध्ये आर्थिक साक्षरेतचा अभ्यासक्रम समाविष्ट करणे आवश्यक आहे.
- **नॉन प्रॉफीट संस्था :** नॉन प्रॉफीट संस्था ग्रामीण भागातील लोकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी कार्यशाळा आणि शिबिरे आयोजित करु शकतात.

या उपाययोजना राबविल्यास ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक साक्षरता वाढेल आणि त्यामुळे त्यांच्या जीवनात सुधारणा होईल.

**या व्यतिरिक्त ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी खालील गोष्टी उपयुक्त ठरतील.**

- आर्थिक साक्षरतेवरील पुस्तके आणि मासिके वाचणे.
- आर्थिक साक्षरतेवरील कार्यशाळा आणि शिबीरांमध्ये भाग घेणे.
- बँका आणि वित्तीय संस्थांशी संपर्क साधने आणि त्यांच्याकडून आर्थिक सल्ला घेणे.
- आर्थिक विषयावर चर्चा करण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांसाठी मंच निर्माण करणे.

ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी शाळांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

**आर्थिक साक्षरतेचा अर्थ :**

आर्थिक साक्षरता म्हणजे पैशांचे व्यवस्थापन आणि निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा, ज्ञानाचा आणि वर्तनाचा संच आहे. त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

**बचत आणि गुंतवणूक :** तुमचे उत्पन्न कसे खर्च करायचे, बचत करायचे आणि गुंतवणूक करायचे याचे ज्ञान.

**कर्ज व्यवस्थापन :** कर्ज घेताना कोणता विचार करायला हवा, कर्ज कसे परत करायचे

**विमा :** विविध प्रकारच्या विम्यांचे महत्व आणि ते तुमच्या गरजेनुसार कसे निवडावे याचे ज्ञान.

**आर्थिक नियोजन :** तुमच्या आर्थिक उद्दिष्टांची व्याख्या करणे आणि त्या साध्य करण्यासाठी योजना बनविणे.

**फसवणूक ओळखणे :** आर्थिक फसवणूक ओळखण्याची आणि टाळण्याची क्षमता.

आर्थिक साक्षरता ही सर्व वयोगटांसाठी महत्वाची असते. परंतु ग्रामीण भागातील लोकांसाठी विशेषत: महत्वाची उपयुक्त स्वतंत्र निर्णय घेण्याची आणि आर्थिक सुरक्षितता प्राप्त करण्याची क्षमता देऊन आर्थिक साक्षरता आपल्या आर्थिक भवितव्याची जबाबदारी घेण्यास मदत करते.

**आर्थिक साक्षरतेचे फायदे :**

**1) चांगले आर्थिक निर्णय :**

- आर्थिक साक्षरता आपल्याला चांगल्या आर्थिक निर्णयांसाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणे.
- नागरिक बचत, गुंतवणूक आणि कर्ज यासारख्या गोष्टींबद्दल महत्वपूर्ण आर्थिक निर्णय घेऊ शकतात.
- नागरिक फसवणूक आणि चुकीच्या आर्थिक सल्ल्यापासून स्वत:चे रक्षण करु शकतात.

**2) आर्थिक सुरक्षितता :**

- आर्थिक साक्षरता आपल्याला आर्थिक सुरक्षितता प्राप्त करण्यास मदत करते.
- आपण आपले पैसे चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करु शकता आणि आपल्या भविष्यासाठी बचत करु शकता.
- आपण कर्जापासून दूर राहू शकता आणि आपले कर्ज भरणे शक्य करु शकता.

**3) आर्थिक स्वातंत्र्य :**

- आर्थिक साक्षरता आपल्याला आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करण्यास मदत करते.
- नियोजनपूर्वक आर्थिक उद्दिष्टे साध्य करु शकता आणि आपल्या जीवनावर नियंत्रण ठेऊ शकता.
- आर्थिक व्यवस्थापनातून आपल्या कुटुंबाला आणि समुदायाला मदत करु शकता.

**4) कमी तणाव :**

आर्थिक साक्षरता आपल्या आर्थिक तणावाचे प्रमाण कमी करु शकते. आपल्याला आपल्या पैशाची काळजी करण्याची गरज नाही आणि आपण आपल्या भविष्याबद्दल अधिक योग्य आर्थिक नियोजन करू शकता.

**5) चांगले जीवन :**

- आर्थिक साक्षरता आपल्याला चांगले जीवन जगण्यास मदत करते.
- आपण आपल्या गरजा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्या पैशाचा वापर करु शकता.
- आपण आपल्या कुटुंबाला आणि समुदायाला समृध्द करु शकता.

आर्थिक साक्षरता एक अमूल्य कौशल्य आहे जे आपल्याला आयुष्यभर उपयुक्त ठरु शकते. आर्थिक साक्षरता ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञान आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**शालेय नेतृत्वाची भूमिका :**

आर्थिक साक्षरता हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण कौशल्य आहे जे विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यात आर्थिक निर्णय घेण्यास मदत करते. शालेय नेतृत्व यात महत्वपूर्ण भूमिका बजावू शकते. शालेय नेतृत्व आर्थिक साक्षरतेसाठी खालीलप्रमाणे योगदान देऊ शकते.

**1) अभ्यासक्रमात आर्थिक शिक्षणाचा समावेश :**

- शालेय नेतृत्व अभ्यासक्रमात आर्थिक शिक्षणाचा समावेश करुन विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेची मूलभूत माहिती देऊ शकते.
- यात बजेटींग, बचत, गुंतवणूक, कर्ज आणि विमा यासारख्या विषयांचा समावेश असू शकतो.

**2) कार्यशाळा आणि कार्यक्रमांचे आयोजन :**

- शालेय नेतृत्व विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरतेवर कार्यशाळा आणि कार्यक्रम आयोजित करु शकते.
- या कार्यक्रमांमध्ये तज्ञांना आमंत्रित करुन विद्यार्थ्यांना आर्थिक विषयांवर मार्गदर्शन केले जाऊ शकते.

**3) क्लब आणि संस्थांची स्थापना :**

- शालेय नेतृत्व विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता क्लब आणि संस्थांची स्थापना करु शकते.
- या क्लब आणि संस्थांमध्ये विद्यार्थी आर्थिक विषयांवर चर्चा करु शकतात आणि एकमेकांकडून शिकू शकतात.

**4) प्रेरणादायी उदाहरणे :**

- शालेय नेतृत्व विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या यशस्वी व्यक्तींचे प्रेरणादायी उदाहरणे देऊ शकते.
- यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे महत्व समजण्यास मदत होईल.

**5) पालकांना सहभागी करुन घेणे :**

- शालेय नेतृत्व पालकांना आर्थिक साक्षरतेच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेऊ शकते.
- यामुळे पालक आपल्या मुलांना आर्थिक विषयावर मार्गदर्शन करु शकतील.

शालेय नेतृत्व आर्थिक साक्षरतेसाठी प्रयत्नशील राहून विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या जबाबदार आणि स्वतंत्र बनण्यास मदत करु शकते.

**या व्यतिरिक्त शालेय नेतृत्व खालील गोष्टी करुन आर्थिक साक्षरतेला प्रोत्साहन देऊ शकते.**

- शाळेत पुस्तकालय आणि माहिती केंद्रात आर्थिक विषयांवरील पुस्तके आणि मासिके उपलब्ध करुन देणे.
- विद्यार्थ्यांसाठी आर्थिक विषयांवर वादविवाद, निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करणे.
- विद्यार्थ्यांना बँका आणि आर्थिक संस्थांना भेटी देण्याची व्यवस्था करणे.
- शाळेत विद्यार्थ्यांसाठी शालेय वस्तू भांडार चालविणे.

आर्थिक साक्षरता ही विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे. शालेय नेतृत्व यात महत्वपूर्ण भूमिका बजावून विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि यशस्वी बनण्यास मदत करु शकते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा शासन निर्णय अभ्यासत असताना प्रत्येक विद्यार्थ्याला जागतिक दर्जाचे भविष्य वेधी शिक्षण मिळावे, प्रत्येक विद्यार्थ्यात किमान सहा प्रकारची कौशल्ये रुजावीत, प्रत्येक विद्यार्थी हा मूलभूत साक्षर बनावा असे शासन निर्णयात नमुद केलेले आहे. निपुण भारत घडवायचे असेल तर प्रत्येक बालक हा निपुण होणे आवश्यक आहे. यासाठी मूलभूत पायाभूत साक्षरतेबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याला आर्थिक साक्षर करणे ही काळाची गरज आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातील ही शासनाची शिक्षण विभागाकडून असलेली आर्थिक साक्षरतेची अपेक्षा खरंच रास्त आहे. या विचारांचे चिंतन सुरू असतानाच एक दिवस वर्तमानपत्रात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा भूगाव निपाणी ची "चिमुकल्यांची बँक देते, वित्त व्यवहाराचे धडे" अशा मथळयाची बातमी वाचली आणि मार्ग सापडला. थूगाव निपाणी शाळेच्या मुख्याध्यापकांशी लगेच फोनवर संपर्क साधून त्यांच्या शाळेतील बँकेबाबत माहिती जाणून घेतली व शाळेला भेट देण्याची इच्छाही व्यक्त केली. त्यानुसार काही दिवसांनी मी माझ्या आजनगाव केंद्रातील मुख्याध्यापकांची सभा घेऊन आर्थिक साक्षरता हा विषय चर्चेतून त्यांना समजावून दिला त्यासाठी माझ्या केंद्रातील मुख्याध्यापक व शिक्षक आम्ही थूगाव निपाणी शाळेच्या भेटीसाठी गेलो. सर्व मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी त्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधून उन्नती बँक व तिथला आर्थिक व्यवहार समजून घेतला. आम्ही देखील आमच्या शाळेत अशाच प्रकारची बँक उघडून विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देऊ असे आश्वासित होऊन आम्ही परतलो. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थूगाव निपाणी शाळेचे हे उल्लेखनीय कार्य बघून सर्व मुख्याध्यापकांनी आपापल्या शाळेत आर्थिक साक्षरतेचे धडे देण्यास सुरुवात केली. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी बचत बँक सुरू केली. त्याचा लेखाजोखा ठेवू लागले. आठवड्यात एक तासिका घेऊ लागले. शाळा भेटीदरम्यान मी स्वतः शाळेतील बँकेचे कार्य बघू लागले.

आर्थिक साक्षरता विद्यार्थ्यांना अधिक चांगली समजावी म्हणून शालेय ग्रंथालयात आर्थिक विषयांवरील पुस्तके, मासिके ठेवण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी आर्थिक विषयांवर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, शाळेतच विद्यार्थ्यांसाठी शालेय वस्तू भांडार निर्माण करणे या गोष्टींवर भर देण्यात आला. त्याप्रमाणे माझ्या केंद्रात या सगळया गोष्टी घडत आहेत. आर्थिक साक्षरतेवर आधारित सर्व उपक्रम शाळांमध्ये राबविले जातात. अशाच आर्थिक साक्षरतेबाबत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दोन मुख्याध्यापकांची यशोगाथा या मॉड्यूलमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

## यशोगाथा १

### जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, थुगाव निपाणी, पं. स.नरखेड, जि. नागपूर

### मुख्याध्यापक - श्री धनंजय पकडे

नागपूर पासून 90 किलोमिटर अंतरावर मध्यप्रदेश सीमेलगत असलेल्या नरखेड येथे एका सर्वसाधारण शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. माझे शिक्षण कळमेश्वर तालुक्यातील मोहपा येथील नगर परिषद शाळेत झाले. पुढे बारावी उत्तीर्ण केले व काका शिक्षक असल्याने त्यांच्या मार्गदर्शनामुळे डी. एड. करण्याचा निर्णय घेतला येथूनच शिक्षण क्षेत्रातील प्रवास सुरु झाला.

डिसेंबर 2001 मध्ये लातूर जिल्ह्यातील जायफळ गावात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतून नोकरीची सुरुवात झाली. गावात दळणवळणाची साधने अपुरी असल्यामुळे शाळेत येण्याजाण्यास विलंब व्हायचा. तरीही शिक्षण दर्जा चांगला राहील यासाठी प्रयत्नशील होतो. विद्यार्थ्यांमधील प्रगती बघता गावकऱ्यांकडून मला पाठबळ मिळू लागले. जायफळ शाळेत सहा वर्षे पूर्ण झाल्यावर नागपूर जिल्ह्यात काटोल पंचायत समिती अंतर्गत बदली झाली. त्यावेळी तत्कालीन उपशिक्षणाधिकारी आणि प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी एकदा शाळाभेटी दरम्यान चुकीच्या माहितीवरुन माझा खुप अपमान केला, हा अपमान जिव्हारी लागला. मनात आत्महत्येचा विचारही आला. परंतु यावेळी स्वत:ला सांभाळत दुसऱ्याच क्षणी या अपमानाची परतफेड विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट शिक्षण देऊन करण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांना सोप्या पध्दतीने शिकवणे, शिस्त लावणे, सामान्य ज्ञान शिकवणे, शिक्षकांची भीती वाटू नये म्हणून प्रयत्न सुरु केले. या कामाच्या बळावर 2017 साली आमच्या शाळेला सुंदर शाळा स्वच्छ शाळा उपक्रमात जिल्ह्यात दुसरा क्रमांक आला. 2018 ला उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी येथे सेवेला सुरुवात केली. या गावाची लोकसंख्या 900. या शाळेत 1 ते 7 पर्यंतचे वर्ग असूनही येथील विद्यार्थ्यांची पटसंख्या केवळ 46

होती. कमी विद्यार्थी संख्या माझ्या मनाला खटकत होती. उन्हाळयाच्या सुट्टयांमध्ये उन्हाळी शिबीराचा विचार मनात आला. त्यासाठी पैसे कुठून उभारावे हा प्रश्न होता. कारण अशा गोष्टींसाठी शासनाकडे निधीची तरतुद नसते. ही गोष्ट गावकऱ्यांना सांगितली. या शिबीराचा विद्यार्थ्यांना काय लाभ होऊ शकतो हे ही पटवून दिले. गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून दोन लाख रुपये गोळा करुन दिले. त्यातून नागपूर जिल्ह्यातील पहिले बालसंस्कार शिबीर हे आमच्या थुगाव निपाणी येथील शाळेत झाले. प्रत्येक वर्षी शिबीरातील मुलांची प्रगती बघून गावकऱ्यांनी हमी दिली. आम्ही तुम्हाला सर्वस्वी मदत करु. शाळेत प्रार्थनेनंतर मुलांना सामान्य ज्ञान, इंग्रजीतून संभाषण, पाढे म्हणणे, इंग्रजी-मराठी भाषेतून सुविचार शिकवले. आमचे नवनवीन उपक्रम यशस्वी होत असतानाच करोना आला. मात्र शिकणाऱ्याला बंधने नसतात हे माझ्या विद्यार्थ्यांनी सिध्द करुन दाखवले. जेव्हा इतर शाळेत करोनामुळे होणाऱ्या तोट्याचा हिशोब जुळवला जात होता. शिक्षणतज्ज्ञ शिक्षणाच्या तुलनेत गरजेनुसार आरोग्याला महत्व देत होते तेव्हा आमचे विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेचे नवनवीन प्रयोग करीत होते. भविष्यवेधी शिक्षण पध्दतीचा वेध घेऊन स्वयंअध्ययन करु लागले. करोना काळात सर्व शाळा बंद असताना 2021 मध्ये गावकऱ्यांच्या मदतीने शाळा सुरु केल्यावर मात्र आमच्याच काही शिक्षक मित्रांनी आम्हाला विरोध दर्शविला. हा प्रकार बघुन मनला दु:ख व्हायचे. पण शाळेतील सहकाऱ्यांचा पाठिंबा आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक तळमळ पाहून नवीन चैतन्यही निर्माण व्हायचे. बालसंस्कार शिबीरात विविध उपक्रम घेतले जातात. या उपक्रमांचा फायदा असा झाला की, विद्यार्थ्यांमध्ये व्यासपीठावर येण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. बालसंस्कार शिबीराच्या माध्यमातून दरवर्षी जमा होणाऱ्या लोकवर्गणीतून वर्षभरातील उपक्रमांसाठी आर्थिक मदत झाली. शिवाय शाळेतील शिक्षकांच्या अपुऱ्या संख्येवर तोडगा म्हणून शिक्षक मित्रांची नेमणूक करता आली.



विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच व्यवहार ज्ञान यावे या हेतूने 11 सप्टेंबर 2019 रोजी उन्नती विद्यार्थी बचत बँकेची स्थापना केली. विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांमार्फत चालवली जाणारी बँक आज एक लाख बारा हजार सहाशे पस्तीस इतकी रक्कम सांभाळणारी बँक बनली. विद्यार्थ्यांना घरातून मिळणारा खाऊचा पैसा, कधी मोठ्या सोहळ्यातील बक्षिसाच्या रकमेपर्यंत पोहचला ते कळलेच नाही. बहिणीच्या लग्नात नातेवाईकांकडून मिळणारे 3000 रु. किंवा शिवजयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धेत मिळवलेले 5000 रु. एकाच दिवशी बँकेचा खातेदार विद्यार्थी इतरत्र न ठेवता या बँकेत विश्वासाने जमा करतो तेव्हा पालकांचा बँकेवरचा विश्वास किती घट्ट आहे याची जाणीव होते. उन्नती विद्यार्थी बचत बँकेची सुरुवात पोळयाच्या दोन दिवसाच्या सुट्टीतल्या विद्यार्थ्यांच्या असामाजिक उपक्रमामुळे झाली असेही म्हणायला हरकत नाही. शाळेतील काही विद्यार्थी गावातील जेष्ठांच्या संगतीला आपसात 'झंडीमुंडी' हा छोटेखानी जुगार खेळतात आणि त्यात पैसे जिंकतात किंवा हरतात असे माहित झाले. त्यात जर ते पैसे तसेच जवळ असतील तर जुगार खेळणे आणखी काही दिवस चालते हे गावातील काही व्यक्तींकडून समजले म्हणून त्यावर अंकुश लागावा आणि विद्यार्थ्यांच्या हातातला पैसा सुरक्षित ठिकाणी गुंतवता यावा या भावनेने ही बँक सुरु करण्यात आली. यासाठी निश्चितच अनुभव पाठीशी होता तो भंडारा जिल्ह्यातील आदर्श शाळा खराशी येथील बँकेचा आणि मागील लिंगा शाळेत स्वत:च चालवलेल्या बँकेचा. त्यामुळे ही बँक सुरु करताना किंवा विद्यार्थ्यांना समजवायला फार त्रास झाला नाही. उन्नती विद्यार्थी बचत बँकेची सुरुवात केल्यानंतर काही पालकांनी नक्कीच अप्रत्यक्ष विरोध केला, इतर बँकेत विद्यार्थ्यांचे खाते असल्यावर पुन्हा शाळेतील बँक खाते कशाला काढायचे असे निरोप बँकेपर्यंत पोहचले. मात्र या सर्व पालकांना समजावून सांगण्यात शक्ती खर्च घालण्याऐवजी दिवाळी सणानिमित्त पणती सजावट आणि आकाश कंदील निर्मिती व विक्री उपक्रमातून मिळालेला प्रतिसाद पालकांना आपोआप बँकेकडे ओढून आणण्यात यशस्वी ठरला. सुरुवातीला 23 खातेदार असलेली बँक आज 146 खातेदार सांभाळते आहे. विशेष म्हणजे वनराईचे अध्यक्ष माननीय डॉ. गिरीश गांधी आणि शिक्षण उपसंचालक पुणे विभाग माननीय पी. एस. मुकुंद साहेब हे सुध्दा या बँकेचे खातेदार आहेत. एकीकडे शाळेची पटसंख्या 101 असताना खातेदार 144 कसे? असा प्रश्न पडतो. तर या प्रश्नाचे उत्तर असे की, शाळेतील 2019 पासुनचे माजी विद्यार्थी आजही बँकेचे खातेदार आहेत.

शाळेतील सर्व वर्गांना समान प्रतिनिधीत्व मिळावे या उद्देशाने लोकशाही पध्दतीने घेतलेल्या निवडणूकीतून 12 संचालकांचे मंडळ निवडून देण्यात आले. ज्यात संचालक मंडळावर शाळेचेच विद्यार्थी

आहेत. त्यांच्याकडूनच बँकेचे कामकाज चालविले जाते. अगदी कॅशबुक आणि लेजर लेखनापासून सारे व्यवहार विद्यार्थीच पाहतात.

शाळेतील बँकेच्या संचालक मंडळाची नियमित बैठक आयोजित केली जाते. ज्यात केवळ आर्थिक विषयावर चर्चा न करता प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबाबत विचार विनिमय करुन अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना कशी मदत करता येईल याचे नियोजन केले जाते असे अध्यक्षांनी सांगितले. भविष्यात बँकेचे सारे व्यवहार डिजिटल करुन बँकेचे कामकाज करण्यासोबतच मुदत ठेव योजना आणण्याचा मानस सचिवांनी बोलून दाखविला. आर्थिक साक्षरतेचे धडे गिरवत विद्यार्थ्यांचे कौशल्य त्यांची स्वयं शिक्षणाची तयारी आणि आत्मविश्वास अधिक वाढीस लागत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे. ते चांगले आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनत आहेत. भविष्यातील आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी शालेय जीवनापासूनच विद्यार्थी तयार होत आहेत.

इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेमुळे उद्या भविष्यात स्पर्धेच्या युगात येथील विद्यार्थी यशस्वी होतीलच मात्र शासकीय नोकरीवर अवलंबून न राहता कुणी बँकींग आणि शेअर मार्केटमध्ये आर्थिक सल्लागार म्हणून पाहायलाही मिळू शकतात.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा थुगाव निपाणी येथील उन्नती विद्यार्थी बचत बँकेची ख्याती एव्हाना नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय श्रीमती सौम्या शर्मा यांचेपर्यंत पोहोचली होती. त्यांनी प्रत्यक्ष ही बँक बघितल्यावर त्यांना खुप आनंद झाला. त्यांनी हा आर्थिक साक्षरता उपक्रम संपूर्ण नागपूर जिल्ह्यासाठी राबविण्याचा निर्णय घेतला. आर्थिक साक्षरता हा विषय इयत्ता 5 ते 12 वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी राबविण्यासाठी विनोबा ऍ़पच्या मदतीने अभ्यासक्रम तयार करुन आठवड्यातून विद्यार्थ्यांना एक तासिका घेण्याचे शिक्षण विभागाला निर्देश दिले. त्यानुसार संपूर्ण नागपूर जिल्ह्यात आज आर्थिक साक्षरतेचे धडे सर्व शाळा गिरवित आहेत. मला वाटतं हे थुगाव निपाणी शाळेचे यशच आहे. गावाला शाळेचा अभिमान आणि शाळेला गावाचा आधार वाटला तर प्रत्येकच शाळा ही उपक्रमशील शाळा म्हणून नावारुपास येऊ शकते. शुगाव निपाणी शाळेतील विद्यार्थी ज्याप्रमाणे आर्थिक साक्षर होत आहे तसेच नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थीही आर्थिक साक्षर होण्यास थुगाव निपाणी शाळा एक आदर्श ठरू शकते.



# उन्नती विद्यार्थी बचत बँकेने दिला १६ टक्के लाभांश

## थुगाव (नि.) शाळेतील विद्यार्थ्यांचा अनोखा प्रयोग

**वार्ताहर / मेंढला**

एकीकडे वेगवेगळ्या पतसंस्थांमध्ये नफ्याच्या वितरणातून मिळणाऱ्या लाभांश वाटपातून संचालक आणि सभासदांमध्ये नाराजीनाट्य रंगताना दिसते. जेथे शिक्षकांच्या पतसंस्थेत दोन ते तीन टक्के लाभांश वाटप केल्या जात असल्याचे चित्र असताना थुगाव (निपाणी) शाळेतील चिमुकल्या संचालकांनी उन्नती विद्यार्थी बचत बँकेच्या सभासदांना तब्बल १६ टक्के लाभांश देऊन सभासदांची दिवाळी गोड केली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी राबविलेल्या पणती व आकाशकंदील निर्मिती व विक्री उपक्रमातून तब्बल ३४००० रुपयांची कमाई केली. ज्यात खर्च वजा जाता १३००० रुपये निव्वळ नफा मिळविला, तोही दोन दिवसात. या उपक्रमातून झालेला नफा सर्व सभासदांचे खात्यावर सारख्या प्रमाणात वितरण करताना इयत्ता ३ री ते ८ वीच्या संचालकांनी इतक्या योग्यपद्धतीने नफ्याचे नियोजन करून लाभांश वितरणाची कल्पना निश्चितच कौतुकास्पद आहे. आजच्या कोवळ्या वयात मिळालेले आर्थिक ज्ञान उद्याच्या भविष्यातील अर्थतज्ज्ञांच्या निर्मितीला बळ देणारे आहे.

बँकेचे अध्यक्ष पार्थ हिवसे यांनी मिळालेला लाभांश वाटप करताना सभासदांच्या चेहऱ्यावरील आनंद अवर्णनीय होता, असे सांगितले. उपाध्यक्ष आरुषी टेकाडे आणि सचिव आर्या डिग्रसकर यांनी केलेल्या आर्थिक नियमनाचे शाळा व्यवस्थापन समिती तथा पालक वर्गातून कौतूक केले जात असल्याची प्रतिक्रिया शाळेचे मुख्याध्यापक धनंजय पकडे यांनी दिली.

माझ्या मुलाला जमा असलेल्या १०२१५ रुपये रकमेवर मिळालेला १६३३ रुपये लाभांश खरोखरच इतर कुठल्याही बँकेत मिळणाऱ्या नफ्यापेक्षा अधिक आहे. ज्याची बचत अधिक त्याचा नफा अधिक या तत्वामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची चढाओढ लागेल.

**–रेखा ओमकार** (पालक)



# पुण्य नगरी

उन्नती बचत बँकेने दिला १६ टक्के लाभांश ▮ थुगाव (नि.) जि.प. शाळेत अर्थसाक्षरतेचा नवा प्रयोग

## बड्या पतसंस्थांना जमले नाही, ते विद्यार्थ्यांनी करून दाखविले

**पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी**

काटोल : एकीकडे वेगवेगळ्या पतसंस्थांमध्ये नफ्याच्या वितरणातून मिळणाऱ्या लाभांश वाटपातून संचालक आणि सभासदांमध्ये वाद व नाराजीनाट्य आहे. इतकेच नव्हे तर शिक्षकांच्या पतसंस्थांत दोन ते तीन टक्के लाभांश वाटप केला जात असल्याचे चित्र असताना थुगाव (निपाणी) शाळेतील चिमुकल्या संचालकांनी उन्नती विद्यार्थी बचत बँकेच्या विद्यार्थी सभासदांना तब्बल १६ टक्के लाभांश देऊन सभासदांची दिवाळी गोड केली आहे. सध्या जिल्हा परिषद सीईओंच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देण्याचे काम शाळांतून सुरू आहे. त्याचे यशस्वी निकाल थुगाव निपाणी शाळेच्या माध्यमातून आता खऱ्या अर्थाने पुढे येऊ लागले आहे.

विद्यार्थ्यांनी राबविलेल्या पणती व आकाशकंदील निर्मिती व विक्रीतून तब्बल ३४ हजार रुपयांची कमाई केली. ज्यात खर्च वजा जाता निव्वळ नफा १३ हजार रुपये इतका मिळाला. तोही दोन दिवसांत. या उपक्रमातून झालेला नफा सर्व सभासदांच्या खात्यावर समप्रमाणात वितरण करण्यात आला. इयत्ता तिसरी ते आठवीच्या संचालकांनी इतक्या योग्य पद्धतीने नफ्याचे नियोजन केले. लाभांश वितरित केला. ही कल्पना कौतुकास्पद ठरली आहे. कोवळ्या वयात मिळालेले आर्थिक ज्ञान उद्याच्या भविष्यातील अर्थतज्ज्ञांच्या निर्मितीला बळ देणारे आहे, अशा प्रतिक्रिया शिक्षणतज्ज्ञांच्या आहेत. बँक अध्यक्ष पार्थ हिवसे यांनी मिळालेला लाभांश वाटप करताना सभासदांच्या चेहऱ्यावरील आनंद मोजता न येणारा असल्याचे सांगितले. उपाध्यक्ष आरुषी टेकाडे आणि सचिव आर्या डिग्रसकर यांनी केलेल्या आर्थिक नियमनाचे शाळा व्यवस्थापन समिती तथा पालकांनी कौतुक केले आहे. अर्थसाक्षरतेसाठी अशा प्रकारचे उपक्रम काळाची गरज असल्याची प्रतिक्रिया मुख्याध्यापक धनंजय पकडे यांनी व्यक्त केली. या उपक्रमाचे जिल्हा परिषद सीईओ सौम्या शर्मा, प्राथमिक शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार यांनी कौतुक केले आहे.

“माझ्या मुलाला जमा झालेल्या १० हजार २१५ रुपयांवर मिळालेला १६३३ रुपये लाभांश खरोखरच इतर कुठल्याही बँकेत मिळणाऱ्या नफ्यापेक्षा अधिक आहे. ज्याची बचत अधिक त्याचा नफा अधिक या तत्त्वामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची चढाओढ लागेल.

-रेखा ओमकार, पालक, थुगाव निपाणी

Smart Nagpur Edition
Nov 19, 2023 Page No. 03
Powered by : eReleGo.com



# लोकमत

विद्यार्थीच संचालक अन् विद्यार्थ्यांच्याच शिलकीची होते गोळाबेरीज

## चिमुकल्यांची चिमुकली बँक, देते वित्त व्यवहाराचे धडे!

**श्याम नाडेकर**
लोकमत न्यूज नेटवर्क

नरखेड : लहान मुलांचे एक स्वतंत्र जग असेल तर... कल्पना करा, ते जग कसे असेल? त्यांचे आचार-विचार-व्यवहार सारेच कसे असतील? दूरदृष्टी असेल का त्यांच्यात? आलेल्या समस्या ते कशा तऱ्हेने हाताळतील? आदी अनेक प्रश्न पडलेच असतील. तर पडू द्या! कारण, या जगाची पायाभरणी झाली आहे.

ही गंमत नव्हे तर वास्तव आहे. नरखेड तालुक्यातील थुगाव निपाणी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःची 'उन्नती विद्यार्थी बचत बँक' उभारली आहे. या बँकेचे संचालक मंडळ म्हणजे विद्यार्थीच अन् गोळी-बेरीज करणारेही विद्यार्थीच आहेत. या बँकेला आज म्हणजे ११ ऑगस्टला चार वर्षे पूर्ण होत आहेत.

बँकेचे आर्थिक व्यवहार करताना उन्नती विद्यार्थी बचत बँकेचे चिमुकले संचालक मंडळ.

### बँकेचे संचालक मंडळ

बँकेची निवडणूक लोकशाही पद्धतीने होते. त्यातून १२ संचालकांच्या मंडळाची निवड होते. वर्तमानात अध्यक्ष पार्थ हिवसे, उपाध्यक्ष आरुषी टेकाडे आणि सचिव आर्या डिग्रसकर यांच्यासह हिमांशू चौधरी, दीपल चौधरी, हर्ष ढोले, भावेश चौधरी, मनस्वी चौधरी, योगिता गोरे, पार्थ चौधरी, तेजस्वी भोयर आणि दोन नामनिर्देशित संचालक नयन टेकाडे आणि विधी सिरसकर असे संचालक मंडळ आहे.

### कसा झाला बँकेचा जन्म?

चार वर्षांपूर्वी मुख्याध्यापक धनंजय पकडे यांच्या कल्पकतेतून मुलांना व्यवहाराचे धडे प्रत्यक्षात मिळावे म्हणून दीपावलीच्या अनुषंगाने पणती बनवणे व विक्री उपक्रम राबवण्यात आला. त्यातून, दोनच दिवसांत विद्यार्थ्यांना ६,४०० रुपये नफा मिळाला. हा नफा वितरित करण्याऐवजी 'उन्नती विद्यार्थी बचत बँक' उदयास आली आणि या बँकेची स्थापना ११ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आली. बँकेला तिसरी ते आठव्या वर्गातील १२ विद्यार्थ्यांचे संचालक मंडळ आहे. त्यातूनच अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्या माध्यमातून दैनंदिन व्यवहार होतो. कॅशबुक, लेजर नोंदणी आदी कामे हेच विद्यार्थी पार पाडतात. आजघडीला बँकेचे १४४ खातेदार आहेत आणि बँकेत ७८,३२७ रुपये जमा आहेत. शाळेची पटसंख्या १०१ असताना खातेदार १४४ कसे, असा प्रश्न पडल्यावर लक्षात आले की २०१९ पासूनचे काही माजी विद्यार्थी आजही बँकेचे खातेदार आहेत. या बँकेतून जमा रकमेवर त्रैमासिक व्याज आकारणीही दिली जाते. याच उपक्रमाची प्रेरणा घेऊन जि.प. नागपूरच्या मुख्याधिकारी सौम्या शर्मा यांनी जिल्ह्यात 'आर्थिक साक्षरता' उपक्रम लागू केला आहे. या शाळेतील विद्यार्थी आपली गुंतवणूक रोखे बाजार (शेअर मार्केट), एसआयपी आदींवर चर्चा करताना आढळतात.

### डिजिटल बँक, मुदत ठेव योजना

भविष्यात बँकेचे सर्व व्यवहार डिजिटली करण्याचा व निरनिराळ्या मुदत ठेव योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना देण्याचा मानस संचालक मंडळ व्यक्त करत आहे.

Hello Nagpur
Page No. 1 Sep 11, 2023
Powered by: erelego.com

**चिंतनात्मक प्रश्न :**

1. नागपूर जिल्ह्यातील काटोल पंचायत समितीतील अधिकाऱ्यांनी श्री धनंजय पकडे सरांचा अपमानच केला नसता तर............ वरील वाक्याद्वारे परिच्छेद पूर्ण करा.
2. श्री धनंजय पकडे सरांनी बालसंस्कार शिबीरच घेतले नसते तर............ वरील वाक्याद्वारे परिच्छेद पूर्ण करा.
3. उन्नती विद्यार्थी बचत बँक श्री पकडे सरांनी का सुरु केली असावी ?

**चर्चा करूया, विचार करूया .......**

1) तुम्ही मुख्याध्यापक म्हणून कार्य करीत असताना आर्थिक बचत बँक काढण्यासाठी कोणकोणते प्रयत्न कराल ?

2) विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता प्राप्त करण्यासाठी मुख्याध्यापक म्हणून आपण कोणकोणते उपक्रम राबवाल ?

## यशोगाथा २

### जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मांगलीतेली, पंचायत समिती,मौदा, जिल्हा नागपूर.

### मुख्याध्यापक - सौ. जयश्री दाढे

सौ जयश्री दाढे, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मांगलीतेली, केंद्र आजनगाव पंचायत समिती मौदा येथे ऑनलाइन बदल्यांमध्ये 2018 ला विषय शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. त्यांच्यासोबत इतर तीन शिक्षक देखील शाळेत रुजू झाले. सर्वांसाठी शाळा, गाव, विद्यार्थी नवीन होते. शाळेत १ ते ७ चे वर्ग व पटसंख्या १२० होती. शाळेचा मुख्याध्यापकाचा चार्ज घेण्यास कोणीच तयार नव्हते. अशावेळी कार्यालयाने मॅडमच्या नावाचे चार्जचे पत्र काढले व आता त्या शाळेच्या मुख्याध्यापक म्हणून कार्य करीत आहे. शाळेचे सर्व शिक्षक अतिशय चांगले, उपक्रमशील आहेत. त्यामुळे शाळेत विविध उपक्रम, उत्सव, कार्यक्रम उत्साहाने राबविले जातात. मांगलीतेली गावाची लोकसंख्या 1100 असून गावात साधारण सधन शेतकरी कुटुंबे, काही शेतमजूर व काही नोकरी करणारी कुटुंबे आहेत. शिक्षणाचे महत्त्व सर्वच गावकऱ्यांना आहे. त्यामुळे शाळेतील शिक्षणाबाबतची जागरूकता सर्व पालकांमध्ये दिसून येते. आपला पाल्य चांगला शिकावा यासाठी पालकांचे शाळेकडे लक्ष असते. शाळेत होणाऱ्या विविध कार्यक्रमात पालकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. शाळेत कुठल्याही गोष्टींची कमतरता असल्यास शाळा व्यवस्थापन समिती लोकसहभागातून शाळेची गरज पूर्ण करतात.

एकदा शाळेत केंद्रप्रमुख मॅडम शाळा भेटीसाठी आल्या. त्यावेळी शाळेत मातापालक संघाचा हळदी-कुंकवाचा कार्यक्रम सुरू होता. त्यावेळी मॅडमने माता पालकांशी संवाद साधला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या त्यात काही मातांनी आपल्या आर्थिक फसवणुकीबाबत मॅडमशी चर्चा केली. एका महिलेच्या पतीच्या मोबाईलमधून खात्यावरील पैसे परस्पर काढल्या गेले त्यामुळे ते कुटुंब खूपच चिंतेत होते. अशावेळी मॅडमने त्यांना आर्थिक साक्षरतेविषयी जागरूक राहण्याचे सांगितले व सर्व शिक्षकांची सभा घेतली. यात त्यांनी शिक्षक,मुख्याध्यापक यांना पालकांना आर्थिक व्यवहाराबाबत जागरुक करायचे असेल तर शाळेतील विद्यार्थ्यांना प्रथम याचे धडे देऊया असे सांगितले. त्यासाठी त्यांनी संदीप चौधरी सरांवर ही जबाबदारी सोपविली. आठवड्यातून एक दिवस श्री चौधरी सर व शाळेचे मुख्याध्यापक विद्यार्थ्यांशी आर्थिक व्यवहाराबाबत चर्चा करू लागले. काही दिवसांनी जिल्हा परिषद नागपूरतर्फे आर्थिक

साक्षरतेबाबत शिक्षकांकरिता प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी चौधरी सरांना प्रशिक्षणाला पाठविण्यात आले . आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर सरांनी सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना हा विषय समजावून सांगितला आणि मग शाळा व्यवस्थापन समितीची सभा घेतली व काही निवडक विद्यार्थी प्रतिनिधीही घेतले. या सभेत सर्वानुमते शाळेतच आर्थिक बचत बँक उघडण्याचे ठरविले.

**विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालविलेली बँक...** पिग्मी बचत बँक शाळेत उघडण्यात आली. मुलांचे खाऊचे पैसे, घरी आलेल्या नातेवाईकांनी हातावर ठेवलेले पैसे, बक्षिसाची रक्कम, वाढदिवसाला मिळालेले पैसे असे सर्व विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होऊ लागले. आज शाळेच्या पिग्मी बॅंकेत जवळजवळ 25 हजार रुपये जमा झालेले आहेत. बँक मॅनेजर, कॅशियर विद्यार्थीच आहेत. बँकेचा सर्व व्यवहार विद्यार्थी श्री चौधरी सरांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रामाणिकपणे करतात.

विद्यार्थ्यांना बँकेचे व्यवहार नीट समजावे म्हणून शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेचे विविध खाते असणाऱ्या तालुक्यातील स्टेट बँकेचे बँक मॅनेजर यांनाच शाळेत मार्गदर्शन करण्यासाठी शाळेत बोलावले . मॅनेजर साहेबांनी विद्यार्थ्यांना बँक कशी चालते, बँकेचे व्यवहार कसे केले जातात याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना बँकेला भेट देण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे एक दिवस शाळेने इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना बँकेत प्रत्यक्ष भेटीसाठी नेले व बँकेचे व्यवहार कसे चालतात याचे प्रात्यक्षिक दाखविले.

आर्थिक साक्षरता हा विषय विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहारांची इत्यंभूत माहिती देऊन ती त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचविण्याचे उत्तम साधन आहे. त्यामुळे जिल्हा परिषद नागपूरव्दारे हा विषय इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंतच्या सर्व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एक तासिका घेण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार शाळेत दर शनिवारी आर्थिक साक्षरतेवर एक तासिका होते. शाळेतील बँकेचे व्यवहार आर्थिक साक्षरतेच्या तासिकेतून मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांना पालकांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना वेळोवेळी दिल्या जातात. त्याचाच परिणाम काही माता पालकांनी शाळेच्या मुख्याध्यापकांना आम्हालाही माहिती द्यावी अशी इच्छा व्यक्त केली. तेव्हा मॅडमने चौधरी सरांशी चर्चा करून एक दिवस गावातील महिलांना आर्थिक व्यवहाराबाबत कार्यशाळेतून माहिती दिली. यात बचत खाते काढणे, आर. डी. काढणे, ऑनलाइन शॉपिंग करणे, ई बँकिंग, कर्ज काढणे, एटीएम कार्ड वापरणे अशा कितीतरी गोष्टी सांगण्यात आल्या. त्यामुळे गावातील पालकांनी देखील शाळेतील बँकेत खाते काढण्याचे ठरविले. त्यानुसार आता

शाळेत देखील पालकांचे खाते काढण्याचा मानस आहे आणि ती प्रक्रिया लवकरच पूर्ण करणार आहोत असे शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले.

मांगलीतेली सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेबाबत सजग करणे, विद्यार्थ्यांमार्फत पालकांना देखील आर्थिक साक्षरतेची माहिती पोहोचविणे, बँक व्यवहारांबाबत विद्यार्थी-पालकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, जबाबदार आर्थिक नागरिक तयार करणे, लहान वयातच मनी मॅनेजमेंटची समज वाढविणे, बचत करणे अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालून शालेय नेतृत्व सिद्ध करणाऱ्या सौ. जयश्री दाढे मॅडम व त्यांना सहकार्य करणारे श्री. चौधरी सरांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.










**गावातील पालक व मत पालक यांच्यासाठी आर्थिक साक्षरतेबाबत मार्गदर्शन**

**चिंतनात्मक प्रश्न :**

1. गावातील माता-पालकांनी आर्थिक साक्षरता शिकणे कितपत उपयुक्त आहे यावर आपले मत नोंदवा?
2. शाळेची आर्थिक बँक अधिक यशस्वी करण्यासाठी आणखी काय करायला हवे असे आपणास वाटते?
3. गावातील संपूर्ण नागरिकांचे बँक खाते शाळेत कसे उघडता येईल याबाबत आपले मत लिहा

**मोड्युलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता -**

आजपर्यंत आर्थिक साक्षरता हा विषय शालेय अभ्यासक्रमात कधीच आलेला नव्हता. परंतु काळाची गरज ओळखून जलद गतीने चालणारे डिजिटल आर्थिक व्यवहार यामुळेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये आर्थिक साक्षरता हा विषय विद्यार्थ्यांना शिकविण्याचा संदर्भ दिलेला आहे. त्या अनुषंगाने शालेय नेतृत्वात आर्थिक साक्षरता अत्यंत उपयुक्त असा विषय आहे. विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता प्राप्त करण्यासाठी शालेय नेतृत्व महत्वपूर्ण भूमिका बजावते. शाळांमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमांतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य नियोजन व प्रभावी नेतृत्वामुळे आर्थिक साक्षरतेचे शिक्षण देता येऊ शकते हे या मोड्युलच्या अभ्यासाने लक्षात येते. सदर मोड्युलचा उपयोग अशाप्रकारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमार्फत पालकांना देखील आर्थिक साक्षर होण्यास मदत होऊ शकते.

**समारोप -**

शाळांच्या अभ्यासक्रमात आर्थिक साक्षरता समाविष्ट केल्याने विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यात मदत होऊ शकते. आर्थिक ज्ञान असणे शैक्षणिक प्रवीणते इतकेच महत्वाचे आहे. महत्त्वपूर्ण आर्थिक निर्णय घेण्यासाठी शालेय वयातच योग्य मार्गदर्शन आवश्यक ठरते ,यासाठी शालेय नेतृत्वाने उभारी घेऊन मुलांच्या आर्थिक साक्षरतेचा पाया पक्का होण्यासाठी प्रयत्न केल्यास उद्याचे नागरिक अधिक सक्षमतेने स्वतः चा आणि इतरांचा विकास करू शकतील यात शंका नाही .

**संदर्भ सूची -**


- संचालक महाराष्ट्र विद्या प्राधीकरण पुणे जानेवारी 2018, शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पुरक वाचन साहित्य.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020
- https://hi.m.wikipedia.org
- https://marathivishwakosh.org
- https://sambhavfoundation.org
- https://images.app.goo.gl/enxaXfrdAyXkyq527


**अधिक माहितीसाठी -**

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ
- राष्ट्रीय आर्थिक साक्षरता मिशन


**मोड्यूल विकसक**
डॉ.शिल्पा शेखर सूर्यवंशी
**केंद्रप्रमुख**
समूह साधन केंद्र,आजनगाव,
पं.स,मौदा, जि.नागपूर

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
**समन्वयक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर

**मार्गदर्शक**
डॉ.वैशाली जामदार
**संचालक**
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),
छत्रपती संभाजीनगर